मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# देशभक्तीचा उत्साह आणि स्वच्छतेचा संकल्प अनोखा संगम

## हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियानांतर्गत महापालिकेकडून भव्य बाईक रॅलीचे आयोजन



**पिंपरी | प्रतिनिधी**

'भारत माता की जय' , 'वंदे मातरम' अशा घोषणांनी दुमदुमलेला परिसर... हातामध्ये अभिमानाने फडकणारा तिरंगा... रस्त्यांवरून शिस्तबद्धपणे पुढे सरसावणारी भव्य बाईक रॅली... देशभक्तीचा उत्साह, स्वच्छतेचा संकल्प आणि पर्यावरणप्रेमाचा संदेश यांचा एकत्रित सोहळा आज पिंपरी चिंचवडमध्ये अनुभवायला मिळाला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा आणि हर घर स्वच्छता' अभियानाच्या निमित्ताने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली आज भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भक्तीशक्ती येथून सकाळी ७ वाजता सुरू झालेली ही रॅली महापालिका मुख्यालयापर्यंत देशभक्तीच्या वातावरणात आणि प्रचंड उत्साहात पार पडली.

या रॅलीत महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, अंकुश झिटे, सुधीर वाघमारे, किशोर दरवडे, शांताराम माने, महेश आढाव, श्रीराम गायकवाड, उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, यमुनानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे गजानन ढमाले , रवींद्र कुकडे यांच्यासह विविध भागातील ज्येष्ठ नागरिक, महापालिकेच्या अग्निशमक, आरोग्य, जनसंपर्क, स्थापत्य, विद्युत तसेच विविध विभागातील कर्मचारी यांसह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' आणि 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सहभागी नागरिकांनी 'माझी वसुंधरा' व स्वच्छतेची सामूहिक प्रतिज्ञा घेऊन पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त शहर आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.

रॅलीत सहभागी बाईकस्वारांनी तिरंग्यांनी सजवलेल्या वाहनांसह शिस्तबद्धपणे प्रवास करत नागरिकांना देशभक्तीचा आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला. या उपक्रमातून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशभक्तीबरोबरच स्वच्छतेचे आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे जनमानसात रुजवण्यात आले.

तसेच महापालिकेच्या 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' या उपक्रमाचा उद्देश केवळ स्वातंत्र्य दिनाचा उत्सव साजरा करणे नसून, नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय आणि पर्यावरणपूरक जीवनशैली रुजवणे असल्याचे यावेळी आरोग्य विभाग प्रमुख उप आयुक्त सचिन पवार यांनी सांगितले तसेच या निमित्ताने शहरातील प्रत्येक घरावर तिरंगा फडकवण्याचे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. तर शहर स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण वृध्दीसाठी शहरात झाडे लावण्याचा सामुहिक संकल्पही करण्यात आला.

### स्वच्छतेची सामुहिक शपथ

» "आम्ही भारताचे सुजाण नागरिक शपथ घेतो की, आम्ही या भारत मातेला, या वसुंधरेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करू, या वसुंधरेला या पर्यावरणाला आमच्यापासून कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेऊ. आम्ही या देशाला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी कटीबध्द राहू व आमच्याकडून पर्यावरणाला त्रास होईल, असे कोणतेही काम आम्ही करणार नाही, जास्तीत जास्त झाडे लावून या देशाला या वसुंधरेला स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदुषणमुक्त करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू", अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. शपथेचे वाचन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# गणेशोत्सवापूर्वी कासारवाडीतील घाटाची स्वच्छता करा

## घाट स्वच्छते पासून येथील ड्रेनेज समस्येची गंभीर दखल घ्यावी; नागरिकांची मागणी




**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कासारवाडीतील घाट परिसर स्वच्छ ठेवण्यासह मूर्ती विसर्जनाच्या नियोजनावर योग्य कारवाई करण्याची मागणी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या जनसंवाद सभेत करण्यात आली. घाट स्वच्छते पासून येथील ड्रेनेज समस्येची गंभीर दखल घ्यावी अशी देखील मागणी नागरिकांनी केली. यावेळी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने L समाधान व्यक्त करण्यात आले.

गणपती आगमनापूर्वी घाट परिसरातील स्वच्छता, मूर्ती विसर्जनासाठी योग्य व्यवस्था, आणि मयत व्यक्तींच्या विसाव्याच्या जागेबाबत प्रशासनाशी चर्चा करण्यात आली. या सर्व विषयांवर लवकरच ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, कासारवाडी रेल्वे गेटजवळील परिसरात ड्रेनेज लाईन चोकअप झाल्यामुळे नागरिकांना दुर्गंधी आणि सांडपाण्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत होता. संबंधित समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करायला अशी मागणी कासरवाडीतील सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर यांनी केली होती.

या जनसंवाद सभेमुळे नागरिकांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांना दिशा मिळाली असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वयाचे नक्कीच चांगली कामे होऊ शकतात असे सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर यांनी सांगितले.

# निगडी-चाकण मेट्रोसाठी सात वर्षे लागणार..!

## औद्योगिक पट्ट्याला प्रतीक्षा; 10 हजार 383 कोटींचा खर्च; शहरामध्ये 31 पैकी 25 स्थानके

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात मेट्रोचा दुसरा मार्ग साकारला जाणार आहे. निगडी ते चाकण या ३१ स्थानके असलेल्या ४०.९२६ किलोमीटर अंतराच्या मार्गासाठी १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने मान्यता दिल्यानंतर तो डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) राज्य शासनाकडे पाठविला जाणार आहे. केंद्राकडून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू होईल. हा मेट्रोमार्ग सुरू होण्यासाठी सहा ते सात वर्षे लागतील, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



दापोडी ते निगडी मेट्रो मार्गानंतर आता निगडीतील भक्ती-शक्ती चौक ते चाकण अशा दुसऱ्या मार्गाचा आराखडा तयार झाला आहे. महामेट्रोने पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे डीपीआर सादर केला आहे. या १० हजार ३८३ कोटी ८९ लाख खर्चाचा डीपीआरमध्ये ३१ मेट्रो स्थानके आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात सर्वाधिक २५ स्थानके आहेत. त्यातील नाशिक फाटा ते संत तुकारामनगर असा १.३३६ किलोमीटर अंतराचा मार्ग तयार आहे. या नव्या मार्गासाठी, तसेच स्थानकांसाठी महापालिका ३३ कोटी रुपये किमतीची १५ हजार ९०९.६५ चौरस मीटर जागा देणार आहे. राज्य शासनाची १ लाख ३४ हजार ८४१.८३ चौरस मीटर जागा आहे. त्या जागेचे मूल्य ७७ कोटी ८ लाख आहे, तर ७२ कोटी २८ लाख रुपये मूल्याची १८ हजार ४७४.१८ चौरस मीटर क्षेत्रफळाची खासगी जागा घेण्यात येणार आहे.

> “ महापालिका व महामेट्रोच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक होणार आहे. त्यात डीपीआरवर चर्चा होईल. त्यानंतर मुख्यमंत्र्यांकडे सादरीकरण केले जाईल. राज्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर डीपीआर केंद्राकडे पाठविला जाईल. या प्रकल्पासाठी महापालिकेचा हिस्सा जमीन व निधी दिला जाईल.
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### महापालिकेचा 15 ते 20 टक्के हिस्सा

- या खर्चात केंद्र शासनाचा १० टक्के, राज्य शासनाचा १० टक्के, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा १५ ते २० टक्के खर्चाचा हिस्सा असणार आहे. उर्वरित ६० टक्के निधी कर्जातून उभारला जाणार आहे.
- पिंपरी-चिंचवड शहरात एकूण २५ मेट्रो स्थानके
- चाकण नगरपालिका हद्दीत सहा स्थानके
- एकूण अंतर -४०.२९६ किमी
- एकूण खर्च- १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये

> “ निधीची उपलब्धता हा या प्रकल्पाचा सर्वात मोठा घटक आहे. वाहतूक रहदारी लक्षात घेऊन काम कोणत्या टप्प्यात करायचे व कसे हाही प्रमुख मुद्दा आहे. हा मार्ग लवकर तयार करण्याचे महामेट्रोचे नियोजन असेल.
> **- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो.**

# श्रीक्षेत्र भीमाशंकर दर्शन यात्रेस महिला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## प्रभाग क्रमांक 8 मध्ये भव्य अध्यात्मिक उपक्रम : माजी नगरसेविका नम्रता लोंढे यांचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभेचे लोकप्रिय आमदार महेश लांडगे यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली, तसेच माजी नगरसेविका नम्रता योगेश लोंढे आणि राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानचे संस्थापक योगेश लोंढे यांच्या संकल्पनेतून प्रभाग क्र. ८ - इंद्रायणीनगर आणि परिसरातील महिला भगिनींसाठी श्रावण महिन्याच्या निमित्ताने एक भव्य अध्यात्मिक दर्शन यात्रा आयोजित करण्यात आली.



श्रावण महिन्यात १२ ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर महादेव यांचे दर्शन घेणे अत्यंत पुण्यप्रद मानले जाते. याच पार्श्वभूमीवर या यात्रेत प्रभागातील तब्बल २ हजार ५४१ महिला भाविकांनी सहभाग नोंदवला.

यात्रेच्या आयोजनात महिलांच्या सुरक्षितता व सोयींचा विशेष विचार करण्यात आला. आरामदायी ट्रॅव्हल्स बसद्वारे सर्व महिलांची वाहतूक करण्यात आली. सकाळी नाश्ता व चहा, तसेच दुपारचे जेवण अशी उत्कृष्ट जेवण व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण प्रवासात कुठलीही अडचण न येता अतिशय शिस्तबद्ध आणि सकारात्मक वातावरणात ही यात्रा पार पडली.

**अध्यात्मिक वातावरण, भाविकांचा आनंद:**

श्रावण महिन्याच्या पवित्र वातावरणात भीमाशंकर महादेवाचे दर्शन घेतल्यावर सर्व महिलांनी आध्यात्मिक समाधान व्यक्त केले. भाविक महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे भाव स्पष्ट दिसत होते. अनेक महिलांनी ही यात्रा “आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव” असल्याचे सांगितले. या अध्यात्मिक यात्रेच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक व आध्यात्मिक बांधिलकीला बळ मिळाले. नम्रता लोंढे यांनी नेहमीच सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. त्यांच्या समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. त्यांच्या अध्यात्मिक जाणिवा आणि महिलांसाठी असलेली संवेदना यामुळेच प्रभागातील महिलांना एकत्र येण्याची आणि भक्तिभावाने एकत्रित प्रवास करण्याची संधी मिळाली.

### भीमाशंकर दर्शन यात्रेची वैशिष्ट्ये :

- २ हजार ५४१ महिला भाविकांचा सहभाग
- सुरक्षित, आरामदायी ट्रॅव्हल्स वाहतूक
- सकस नाश्ता, चहा व स्वादिष्ट जेवण
- कुशल नियोजन, कुठेही गालबोट न लागलेली यशस्वी यात्रा
- अध्यात्मिक वातावरण आणि भक्तिभावाने ओतप्रोत अनुभव

> “ भीमाशंकर दर्शन यात्रेच्या आयोजनानंतर महिला भगिनींनी समाधान व्यक्त केले आहे. अशा अध्यात्मिक उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. या यात्रेच्या माध्यमातून भोसरीतील सामाजिक आणि अध्यात्मिक सौहार्दाचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे."समाजाच्या जडणघडणीत अध्यात्मिक दृष्टिकोन महत्वाचा आहे. महिलांना एकत्र आणून श्रद्धेचा आणि समर्पणाचा अनुभव देणे हीच माझ्यासाठी खरी समाजसेवा आहे."
> **- नम्रता लोंढे, माजी नगरसेविका.**

# पुणेकरांना वाहतुक कोंडीतून मोठा दिलासा!

## गर्दीच्या वेळी दर 6 मिनिटांनी पुणे मेट्रो धावणार; 15 ऑगस्टपासून एकूण फेऱ्या 554 वाढणार

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतुक कोंडीचे ग्रहण लागलेल्या पुणेकरांसाठी आनंदाची माहिती समोर आली आहे. पुणे मेट्रोबाबत मोठी अपडेट असून आता गर्दीच्या वेळी दर ६ मिनिटांनी मेट्रो धावणार आहे. तर विना गर्दीच्या वेळी मात्र दर १० मिनिटाला एक ट्रेन असणार आहे. अशी माहिती पुणे मेट्रोच्या वतीने देण्यात आली आहे.

सध्य सकाळी ९ ते ११ आणि सायंकाळी ४ ते ८ दरम्यान दर सात मिनिटाला एक ट्रेन अशी सेवा नागरिकांना पुरविण्यात येते. मात्र, आता १५ ऑगस्पासून पुणे मेट्रो गर्दीच्या वेळेस दर सहा मिनिटाला प्रवाशांना सेवा देणार आहे.



सद्या पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिका मिळून ४९० फेऱ्यांद्वारे मेट्रो सेवा पुरवत आहे. दर ६ मिनिटाला ट्रेन सेवा यामुळेअधिक ६४ फेऱ्या वाढणार आहे. दिनांक १५ ऑगस्टपासून एकूण फेऱ्या ५५४ वाढणार आहे. अधिकच्या ६४ फेऱ्यांमुळे प्रवाशांना वाहतुक कोंडीतून थोडक्यात दिलासा मिळाला आहे.

दर ६ मिनिटाला ट्रेन चालवण्यास मेट्रो दोन महिन्यापासून प्रयत्नशिल होती. त्या अनुषंगाने अनेकवेळा चाचण्या घेण्यात आल्या. सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता झाल्यानंतर दि. १५ ऑगस्टपासूनदर ६ मिनिटाला सेवा हा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे मेट्रोच्या प्रवासी संख्येत निरंतर वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे पुणे मेट्रोने दैनंदिन मेट्रोच्या फेऱ्यांमध्ये वाढ केली आहे. आता दर सहा मिनिटाला ट्रेन सेवा ही पुरवण्याचा निर्णय मेट्रो प्रशासनाने घेतला असल्याची माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे.

### जुलै महिन्यात चांगला प्रतिसाद

» जुलै, २०२५ या महिन्यामध्ये मेट्रोला चांगला प्रतिसाद मिळाला असून, दैनंदिन प्रवासी संख्या १,९२,००० पर्यंत वाढली . ऑगस्ट, २०२५ मध्येप्रवासी संख्येत निरंतर वाढ होताना दिसत आहे. आज पर्यंत ऑगस्ट २०२५ मध्ये प्रवाशांची सरासरी संख्या २,१३,६२० निदर्शनास आली आहे.

# श्रीकृष्ण जयंती अन् दहीहंडी उत्सवासाठी वाहतूक बदल

## वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभागाकडून विशेष वाहतूक बंदोबस्त आणि मार्गात बदल

**पुणे | प्रतिनिधी**

येत्या १५ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण जयंती आणि १६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या दहीहंडी उत्सवामुळे पुणे शहरातील मध्यवर्ती भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभागाकडून विशेष वाहतूक बंदोबस्त आणि मार्गात बदल करण्यात आले आहेत.

पोलिस उप आयुक्त (वाहतूक) हिंमत जाधव यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, शिवाजी रोड, लक्ष्मी रोड, बाजीराव रोड, टिळक रोड यांसारख्या मध्यवर्ती आणि गर्दीच्या मार्गावर भाविक आणि नागरिकांची मोठी उपस्थिती अपेक्षित आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे वाहतूक बदल करण्यात आले आहेत:

बंडगार्डन विभागात १६ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते मध्यरात्रीपर्यंत तीन तोफा चौक ते ब्ल्यू नाईल चौक दरम्यानचा रस्ता बंद करण्यात येणार आहे. या मार्गासाठी पर्यायी मार्ग दुतर्फा खुले ठेवण्यात आले आहेत.

कोंढवा विभागात १५ ऑगस्ट सकाळी ९ पासून ते १६ ऑगस्ट रात्रीपर्यंत गगन उन्नती चौक व कैसर लॉजजवळील यु-टर्न तसेच खडीमशीन पोलीस चौकी ते श्रीराम चौक मार्ग बंद करण्यात येणार आहे.

वानवडी विभागात १६ ऑगस्ट रोजी दुपारी ४ नंतर गर्दी संपेपर्यंत शिवरकर रोड बंद करण्यात येईल. यासाठी संविधान चौक व साळुंखे विहार रोड हे पर्यायी मार्ग खुले राहतील.



फरासखाना व विश्रामबाग विभागात १६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ४ वाजल्यापासून टप्प्याटप्प्याने शिवाजी रोड, बाजीराव रोड, गणेश रोड आणि लक्ष्मी रोडवरील चौकांवर वाहतूक बंद करण्यात येणार आहे. टिळक रोड, एफ.सी. रोड आणि जुनी सातत्तोटी चौकी हे पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वाहतूक पोलिसांनी नागरिकांना सूचित केले आहे की, त्यांनी सार्वजनिक वाहतूक, पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि पोलिसांच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे. सणाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षितता आणि शिस्त कायम ठेवण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# तरंगवाडी तलावातील पाणी कमी

## तीनशे एकर क्षेत्रावरील पिके आणि फळबागा आल्या धोक्यात; गाळ काढण्याची स्थानिकांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

मे महिन्याच्या शेवटी झालेल्या पावसामुळे तरंगवाडी तलावाच्या परिसरातील सहा गावांतील सुमारे तीनशे एकर क्षेत्रावरील पिके आणि फळबागांनी आतापर्यंत तग धरलेला आहे. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून मोठा पाऊस न झाल्याने आणि तलावातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने पिके जळण्याची भीती निर्माण झाली आहे. यामुळे तरंगवाडी तलावात तातडीने पाणी सोडावे आणि भविष्यात तलावातील गाळ काढण्याची मागणी स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांनी केली आहे.



इंदापूर-बारामती राज्य रस्त्यापासून काही अंतरावर, पुणे जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असणारा तरंगवाडी तलाव ६७ एमसीएफटी पाणी साठवण क्षमता असलेला आहे. हा तलाव निरा डावा कालवा आणि खडकवासला कालव्यातून भरला जातो. गोखळी, तरंगवाडी, झगडेवाडी, विठ्ठलवाडी, वडापुरी आणि इंदापूर या सहा गावांतील सुमारे तीनशे एकर क्षेत्रावरील पिके, फळबागा आणि गोखळी, तरंगवाडी, विठ्ठलवाडी, झगडेवाडी या चार गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना यावर अवलंबून आहेत. तसेच तलावातून १०५ अधिकृत पाणी परवानग्या देण्यात आलेल्या आहेत.

मे महिन्यातील पावसामुळे तलावात काही प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. यामुळे ऊस, मका, कडवळ यासारखी पिके आणि केळी, डाळिंबाच्या बागा सध्या जिवंत आहेत. परंतु, गेल्या दोन-अडीच महिन्यांत मोठा पाऊस न झाल्याने तलावातील पाणी झपाट्याने कमी होत आहे. येत्या काही दिवसांत पाणी न आल्यास हातातोंडाशी आलेली पिके जळण्याची शक्यता आहे.

गोखळी येथील भैरवनाथ सहकारी पाणीवापर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन गोफणे यांनी सांगितले, “परिसरातील गावांमधील पिण्याच्या पाण्याच्या योजना आणि शेतकऱ्यांचे अर्थकारण तरंगवाडी तलावावर अवलंबून आहे. मेनंतर मोठा पाऊस न झाल्याने पिके आणि फळबागा धोक्यात आहेत. त्यामुळे खडकवासला कालवा किंवा निरा डाव्या कालव्यातून तलावात तातडीने पाणी सोडावे.” तसेच भविष्यात तलावातील गाळ काढून त्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण करावे, अशी मागणीही त्यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे. ही मागणी गोखळीचे माजी सरपंच बापू पोळ, तरंगवाडीचे सरपंच आप्पा शिंदे, झगडेवाडीचे सरपंच अतुल झगडे, विठ्ठलवाडीचे सरपंच दिलीप भोंग, उपसरपंच सुहास बोराटे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी केली आहे.

### तलावाचा व्यापक उपयोग

» तरंगवाडी तलावातून इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, विद्या प्रतिष्ठान, दूधगंगा आणि सोनाई दूध संघ यांना पाणीपुरवठा होतो. यापैकी काही संस्थांनी स्वतंत्र पाण्याची व्यवस्था केली असली, तरी तलावावर अवलंबून असणाऱ्या गावांचे आणि शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. यापूर्वी इंदापूर नगरपरिषदेला तलावातून पाणीपुरवठा होत होता, परंतु त्यांनी तो नाकारला. आता पुन्हा तेथून पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणीही जोर धरत आहे.

### तलावात पाणी सोडा

» नितीन गोफणे यांनी सांगितले की, ग्रामस्थांच्या वतीने पालकमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि प्रशासनाकडे तलावात पाणी सोडण्याची मागणी लवकरच केली जाणार आहे. तसेच दीड महिन्यापूर्वी तलावातील गाळ काढण्यासंदर्भात कृषिमंत्र्यांशी झालेल्या चर्चेचा पाठपुरावा करून तलावाचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्याची मागणीही पुढे केली जाईल.

# दुचाकीवरील दाम्पत्यावर बिबट्याचा हल्ला

## वाळुंजवाडी ग्रामपंचायतच्या माध्यमातून या रस्त्यावर विजेचे खांब लावण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

वडगाव काशिंबेग फाटा (ता. आंबेगाव) येथे दुचाकीवरील पती-पत्नीवर बिबट्याने हल्ला केल्याची घटना मंगळवारी (दि. 12) रात्री आठच्या सुमारास घडली. यात दुचाकीस्वार जखमी झाला आहे.



शशिकांत केरभाऊ गायकवाड (वय 48, वाळुंजवाडी, गायकवाडवस्ती, ता. आंबेगाव) असे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी अधिक माहितीनुसार, शशिकांत गायकवाड यांची पत्नी वैशाली गायकवाड या भीमाशंकर रुग्णालयात काम करतात.

मंगळवारी रात्री शशिकांत हे पत्नीला भीमाशंकर रुग्णालय येथे कामावर सोडवण्यासाठी घेऊन जात होते. त्या वेळी रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला.

या हल्ल्यात दुचाकी घसरून खाली पडली. त्यामुळे गायकवाड पती-पत्नी हेदेखील रस्त्यावर पडले. त्या वेळी बिबट्याने पुन्हा त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी बिबट्याच्या दिशेने जोरजोरात दगड फेकून मारले. त्यामुळे बिबट्याने तेथून पळ काढला. त्या वेळी बिबट्याच्या हल्ल्यात शशिकांत गायकवाड हे जखमी झाले आहेत. त्यांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, वाळुंजवाडी परिसरात बिबट्या आढळण्याचे प्रमाण वाढले आहे. काही दिवसांपूर्वी अरुण निघोट यांच्या कुत्र्याला बिबट्याने ठार केले. रात्रीच्या वेळी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अंधार असतो. त्यामुळे रस्त्यावरून ये-जा करताना जीव मुठीत धरून जावे लागते, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

वाळुंजवाडी ग्रामपंचायतच्या माध्यमातून या रस्त्यावर विजेचे खांब लावण्यात आले आहेत. मात्र, सात ते आठ महिने होऊनदेखील या खांबांवर बल्ब लावण्यात आले नाहीत. ग्रामपंचायत प्रशासनाने विजेची सोय करावी. तसेच वन विभागाने या ठिकाणी पिंजरा लावावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.